# महावितरण

# जाहीर सुचना

अधीक्षक अभियंता, महावितरण कार्यालय, शहर मंडळ औरंगाबाद या आस्थापनेवर एका वर्षा (सन २०२१-२२) करिता प्रशिक्षणासाठी शिकाऊ उमेदवारांच्या एकुण ७४ जागा भरण्यासाठी एस.एस.सी. उत्तीर्ण व विजतंत्री/ तारतंत्री या व्यवसायात आय. टी. आय. उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक पात्र उमेदवारांनी दिनांक दि.२५.११.२०२१ ते ०६.१२.२०२१ रोजी पर्यंत संध्याकाळी ०६.१५ वा. पर्यंत www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर आस्थापना क्र. **E02182700043** वर ऑनलाईन अर्ज सादर करावेत. तरी दिनांक ०६.१२.२०२१ नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**टिप:** अर्ज करावयाची शेवटची तारीख दिनांक ०६.१२.२०२१ रोजी सायं ०५:३० पर्यंतची राहील. उमेदवाराने www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. **सदर भरती ही फक्त औरंगाबाद जिल्हयातील रहिवाशी असलेल्या उमेदवारांसाठी असुन इतर जिल्हयातील उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.** ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी सर्व संबंधीत कागदपत्रांची (शैक्षणिक प्रमाणपत्र - आयटीआय गुणपत्रक व सनद, एसएससी सनद, जातीचा दाखला, आधारकार्ड, ई.) साक्षांकीत छायांकित प्रत दि. ०६.१२.२०२१ पर्यंत अधीक्षक अभियंता, महावितरण कार्यालय, शहर मंडळ औरंगाबाद विद्युत भवन जुन पावर हाऊस कंपाऊंड, ज्युब्ली पार्क, औरंगाबाद येथे प्रत्यक्ष सादर करावी. तसेच शैक्षणिक व इतर कागदपत्रांची साक्षांकीत छायांकित प्रत सादर न करणा-या उमेदवारांच्या ऑनलाईन अर्जाचा विचार केला जाणार नाही. उमेदवारांनी अर्ज व मुळ कागदपत्रे पडताळणीसाठी दि. १६.१२.२०२१ व दि. १७.१२.२०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता या कार्यालयास हजर रहावे. शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रियेत आवश्यकता भासल्यास बदल करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहील. शिकाऊ उमेदवारांची निवड झाल्यानंतर काही कारणास्तव अप्रेंटीस बोर्ड मुंबई यांचेकडुन उमेदवाराची नोंदणी नाकारल्यास उमेदवाराची शिकाऊ उमेदवारी आपोआप रद्द होईल.

**पी.आर.ओ. क्र. १२९** **अधिक्षक अभियंता शहर मंडल, औरंगाबाद**